# साकोली शासकीय तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश सुरू

**लोकशाही वार्ता/ साकोली**

तंत्रशिक्षण संचालनालयमार्फत राबविण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी व बारावी, आयटीआय, एमसीव्हीसी नंतर इंजिनिअरिंग डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रथम वर्ष, पॉलिटेक्नीक डिप्लोमा अभ्यासक्रमाकरीता ३० जून ते २३ जुलै या कालावधीकरीता शासकीय तंत्रनिकेतन साकोली ही संस्था सुविधा केंद्र म्हणून कार्य करणार आहे.

प्रथम वर्ष इंजिनिअरींग डिप्लोमा प्रवेशाकरीता दहाव्या वर्गाची गुणपत्रिका नसेल तरीही इच्छुक विद्यार्थी बैठक क्रमांकाच्या आधारे अर्ज करु शकतात. भंडारा जिल्ह्यातील इच्छुक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात उज्वल भविष्याकरीता सुविधा केंद्रात जाऊन प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य तथा नोडल अधिकारी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया जिल्हा भंडारा डॉ. सी. एस. थोरात यांनी केले आहे.

---

देशोन्नती — एक्सक्लूझिव्ह अपडेट

# अभियांत्रिकी पदविका प्रवेश प्रक्रिया सुरु

देशोन्नती वृत्तसंकलन...

## ▸▸दहावीचे विद्यार्थी बैठक क्रमांकाद्वारे करू शकतात नोंदणी

**सेंदूरवाफा** ▪ कोरोनामुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर उथलपुथल झाली असून याचा फटका विद्यार्थ्यांना बसला आहे. तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी, बारावी, आयटीआय, एमसीव्हीसी नंतर अभियांत्रिकी पदविका प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. अभियांत्रिकी पदविका प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेचा कालावधी ३० जून ते २३ जुलै २०२१ असा ठेवण्यात आला असून प्रवेश प्रक्रियेचे सुविधा केंद्र एफ. सी. ४००८ साकोली येथील शासकिय तंत्रनिकेतन येथे ठेवण्यात आले आहे.



भंडारा जिल्ह्यातील व ग्रामीण भागातील अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सदर संकेत स्थळावर सर्वप्रथम नोंदणी करणे आवश्यक आहे. जेणेकरून केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत कॅप राऊंड प्रवेश घेता येईल. नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरून केंद्रामार्फत प्रवेश निश्चित करणे महत्वाचे आहे. यंदा प्रथम वर्ष प्रवेशासाठी दहावीची गुणपत्रिका उपलब्ध नसेल तर इच्छूक विद्यार्थी बोर्डाचा बैठक क्रमांक घालून अर्ज करू शकतो. दहावीच्या निकालानंतर त्याला बोर्डाकडून प्राप्त गुण अर्जात समाविष्ट करता येतील. सीबीएससी व आयसीएससी बोर्ड उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे गुण त्यांच्या गुणपत्रिकेच्या आधारे भरले जातील. मागील वर्षीप्रमाणेच यंदासुद्धा फिजिकल व ई स्क्रूटीनी ही सुविधा उपलब्ध राहील. कोरोणाचा प्रादूर्भाव लक्षात घेता पालक व विद्यार्थ्यांची गर्दी टाळण्याच्या दृष्टीकोनातून ई स्क्रूटीनी हा विकल्प देण्यात आला आहे. याकरिता अर्जदारास प्रत्यक्ष अर्ज करण्यासाठी सुविधा केंद्रात उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही. अर्ज भरण्यापासून ते प्रवेश निश्चित होईपर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाईन इंटरनेट किंवा अँड्राईड मोबाईलद्वारेच पूर्ण करता येईल. (प्रतिनिधी)

जिल्ह्यामीतातील इच्छूक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात उज्वल भविष्य घडविण्याकरीता सामाजिक अंतर व इतर नियमांचे पालन करत शासकिय तंत्रनिकेतन साकोली येथील सुविधा केंद्रात जावून केंद्रभूत प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा नोडल अधिकारी व तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. सी. एस. थोरात यांनी केले आहे. सुविधा केंद्राची यादी, मूळ कागदपत्रांची छानणी व पडताळणी व इतर माहिती संकेतस्थळावर पहावी.